# वनशक्तीच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी निसर्ग भ्रमंती

**ठाणे :** पर्यावरण विषयावर काम करणाऱ्या 'वनशक्ती' या संघटनेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी निसर्ग भ्रमंतीचे आयोजन करण्यात आले होते.

कोपरी येथील दत्ताजी साळवी उद्यानातील या भ्रमंतीमध्ये ५० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन वनस्पती, फुलांची माहिती आणि त्यांचे महत्त्व जाणून घेतले. दत्ताजी साळवी उद्यानात विविध दुर्मीळ प्रजातींचे वनस्पती आणि फुले आहेत.

शाळकरी मुलांना वनस्पती, फुलांची माहिती मिळावी यासाठी वनशक्ती या संस्थेने रबाळे येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यार्थ्यांसाठी विनामूल्य निसर्ग भ्रमंतीचे आयोजन केले होते. वनशक्तीच्या प्रकल्प अधिकारी चित्रा म्हस्के यांनी विद्यार्थ्यांना वनस्पती, फुलांची माहिती दिली.

लोकसत्ता Fri, 28
https:/,